पुढारी MY कोल्हापूर शनिवार, ३१ ऑगस्ट २०२४

# 'विवेकानंद'चे तीन छात्र थल सैनिक कॅम्पसाठी रवाना

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयातील एनसीसी विभागातील तीन छात्रांची दिल्ली येथील थल सैनिक कॅम्पसाठी निवड झाली. सेला रेगे, चेतन पवार, सार्थक कुलकर्णी हे थल सैनिक कॅम्पसाठी रवाना झाले आहेत. निवडीबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी अभिनंदन केले.

तरुण भारत संवाद
शनिवार, ३१ ऑगस्ट २०२४

# एनसीसी मॅरॅथॉन स्पर्धेत 'विवेकानंद'चा तुरटे प्रथम

**कोल्हापूर :** एनसीसी ग्रुपमार्फत पाच किलोमीटर मॅरॅथॉन स्पर्धेत शहरातील ४०० एनसीसी छात्रांनी भाग घेतला. कोल्हापूर एनसीसी ग्रुपमार्फत स्पर्धेसाठी विवेकानंद महाविद्यालयातील ३० छात्रांनी सहभाग घेतला. स्पर्धेत सार्जंट साहिल तुरटेने प्रथम क्रमांक पटकावला. सहभागींना प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. श्रुती जोशी, एनसीसी विभागप्रमुख कॅप्टन सुनीता भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, रजिस्टार आर. बी. जोग, पाच महाराष्ट्र बटालियन प्रमुख कर्नल मानस दीक्षित, कर्नल सुहास काळे, अपूर्वा शेलार यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ
शनिवार, ३१ ऑगस्ट २०२४

# 'सेंट झेविअर्स', 'शाहू विद्यालय', 'विवेकानंद', 'डी. वाय.' विजयी

## महापालिकास्तर शालेय शासकीय बॅडमिंटन स्पर्धा : शांतिनिकेतन स्कूलचा पराभव

■ सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर : राजोपाध्येनगर बॅडमिंटन हॉलमध्ये झालेल्या महापालिकास्तर १४ वर्षांखालील विजयी सेंट झेविअर्स व छत्रपती शाहू विद्यालय संघासोबत उपस्थित मान्यवर. दुसऱ्या छायाचित्रात १९ वर्षांखालील विवेकानंद कॉलेज व डी. वाय. पाटील कॉलेजच्या संघासोबत उपस्थित मान्यवर.

कोल्हापूर, ता. ३० : महापालिका व जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालयाच्या वतीने आयोजित केलेल्या शालेय शासकीय बॅडमिंटन स्पर्धेत सेंट झेविअर्स हायस्कूल, छत्रपती शाहू विद्यालय, विवेकानंद महाविद्यालय, डी. वाय. पाटील ज्युनिअर कॉलेज या संघांनी विविध गटांत विजेतेपद पटकावले.

राजोपाध्येनगर बॅडमिंटन हॉलमध्ये झालेल्या या स्पर्धेत शहरातील बहुतांशी शाळांनी सहभाग नोंदविला होता. १४ वर्षांखालील गटात मुलांमध्ये सेंट झेविअर्स हायस्कूलने शांतिनिकेतन स्कूलचा दोन विरुद्ध शून्य गुणांनी पराभव करीत विजेतेपद मिळवले. विजयी संघात आयुष कदम, रणवीर पाटील, वेद मट्टीमनी, शार्विल मेंच, स्वरेन पाटील यांचा समावेश आहे. मुलींमध्ये छत्रपती शाहू विद्यालयाने (सीबीएसई) होलीक्रॉस हायस्कूलचा दोन विरुद्ध शून्य गुणांनी पराभव करीत विजेतेपद पटकावले. विजयी संघात सुभेदार वनंतरम, इशिता पाटील, प्रिशा मेहता, रिद्धी ओसवाल, ऋषिता पाटील यांचा समावेश होता.

१७ वर्षांखालील मुलांमध्ये छत्रपती शाहू विद्यालय (सीबीएसई) संघाने सेंट झेविअर्स हायस्कूलचा दोन विरुद्ध एक गुणाने पराभव करीत विजेतेपदाला गवसणी घातली. विजयी संघात वेदांत मोरे, वेदांत पाटील, आयुष पाटील, ज्योतिरादित्य घुटे-पाटील, सुजल आडवकर यांचा समावेश होता. मुलींमध्ये शांतिनिकेतन स्कूलने छत्रपती शाहू विद्यालय (एसएससी) संघाचा पराभव करीत विजेतेपद पटकावले. विजयी संघात गार्गी आंबेकर, दिशा जोग, श्रेया कात्रुट, रितिका भोसले, अस्मी उरणकर यांचा समावेश होता.

१९ वर्षांखालील गटात मुलांमध्ये विवेकानंद कॉलेजने छत्रपती शाहू विद्यालय ज्युनिअर कॉलेजचा दोन विरुद्ध शून्य गुणाने पराभव केला. विजयी संघात अभिनव हरणे, करण मोकारिया, शिवेंद्र चव्हाण, समीप भातेजा, स्वर्ण भोळा यांचा समावेश होता. मुलींमध्ये अंतिम फेरीत डी. वाय. पाटील ज्युनिअर कॉलेजने विवेकानंद कॉलेजचा दोन विरुद्ध शून्य गुणाने पराभव करीत विजेतेपद पटकावले. विजयी संघात आदिती नरके, भार्गवी तोडकर, मुग्धा पाटील, राधिका काणे, हादी कापडी यांचा समावेश होता.